१५५

क्र :एलआर १००/सीआर४०१०/भू-३/२००१
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, (म. रा.) पुणे ,
नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
विधान भवना समोर, पुणे.
दिनांक : ४/६/२००१

वाचा : या कार्यालया कडील परिपत्रक क्र.एल.आर.१००/५६८/ल-३/७८, पुणे दिनांक ३/७/७८.

विषय : निमताना मोजणी प्रकरणी करावयाची कार्यवाही.

परिपत्रक

आमचे असे निदर्शनास आले आहे की, निमताना कामी फेर निमताना पूर्व मोजणी करुन अंतीम निर्णय घेणेत येतो. वास्तविक ते अपील कार्यपध्दती नुसार चुकीचे आहे. निमताना मोजणी प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही केली जात नाही. सबब निमताना मोजणी प्रकरणी कार्यवाही बाबत खालिलप्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल. आर. १०० /५६८/ ल-३/ ७८, पुणे, दिनांक ३/७/१९७८ अन्वये हदद कायम मोजणी प्रकरणात निमताना मागणी केल्यास ते कनिष्ठ अधिका-याचे निर्णयावरील वरिष्ठ अधिका-याकडे केलेले अपील असल्याचे स्पष्ट केले आहे. सबब अपीलातील कायदेशिर तरतुदी मधील कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे महत्वाची बाब म्हणजे सदरचा निमताना (अपील) विहित मुदतीत मागणी केला आहे अगर कसे ? याची खात्री पडताळणी होणे आवश्यक आहे. निमताना मोजणी प्रकरणी निर्णय घेताना पहिला कनिष्ठ अधिका-याने दिलेला निर्णय तपासून तो अंशत: बदलणे, पूर्ण रदद करणे आवश्यक आहे काय ? हा निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने ज्या मोजणी विरुध्द निमताना मागणी केली आहे. तो मोजणी शीट प्रत्यक्ष जागेवर फलक यंत्रावर लावून भूकरमापकाने घेतलेल्या वहिवाटीच्या खुणा तपासणे व मूळ अभिलेखाचे द्वारे माजी आधारे निश्चित केलेल्या खुणा याची तपासणी करणे आवश्यक आहे. अशी तपासणी वेळी जर मोजणी नकाशा फलक यंत्रावर किमान दोन कायम खुणांचे आधारे कायम करतां येत नसल्यास तसा स्वतंत्र रित्या सविस्तर शेरा मूळ शीट वर ठेवणेत यावा. व त्या द्वारे तो शीट रदद करुन नंतरच निमताना पूर्व मोजणी करुन निमताना प्रकरणी अंतीम निर्णय घेणेत यावा.

स्वाक्षरी/-(मोहन फडतरे)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य,

प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख,(सर्व) / अधीक्षक भूमि अभिलेख ,(सर्व)/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख (सर्व)/ नगर भूमापन अधिकारी,(सर्व), यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२. अधीक्षक भूमि अभिलेख, सर्व यांना अधिनस्त कार्यालयांस देण्याच्या जादा प्रतिसह, प्रति अधिनस्त कार्यालयांस देवून तसे इकडे ज्ञात करावे.

'निर्गमित'

४/६/२००१

(पं.रा.काणेकर)
जमाबंदी उप आयुक्त,
(भूमापन) पुणे.

S-१३०